मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प
प्रकल्प समन्वयन व व्यवस्थापन कक्ष
शेती महामंडळ भवन, २७०,भाबुर्डा ,सेनापती बापट मार्ग ,पुणे -१६
संकेतस्थळ : www.smart-mh.org , दूरध्वनी ०२०-२५६५६५७७/२५६५६५७८

जा.क्र. स्मार्ट /पी.सी.एम.यु./प्र.अ.क./संपादण/406 /२०२२-२३ दिनांक -06 /०३ /२० २३

प्रती,
प्रमुख प्रकल्प अंमलबजावणी कक्ष - (सर्व),
स्मार्ट प्रकल्प

विषय :- स्मार्ट प्रकल्पांतर्गत समुदाय आधारित संस्थाव्दारे करण्यात येणा-या संपादन प्रक्रियांमध्ये निविदा शुल्क निश्चिती बाबत

संदर्भ:-स्मार्ट/पी.सी.एम.यु./सीबीओ/संपादण /१२७१ /२०२२ दि.२९ /०८ /२०२२ रोजीच्या मार्गदर्शक सूचना.

मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट ) प्रकल्पांतर्गत प्रकल्प ,विभाग व जिल्हा अंमलबजावणी कक्ष स्तरावर विविध बाबींसाठी संपादन करावे लागते तसेच समुदाय आधारित संस्थेच्या (CBO) मुल्यसाखळी विकासाचे उपप्रकल्प राबविताना विविध वस्तू, बांधकामे, सल्लागार सेवा इत्यादीचे संपादन संदर्भ क्र. १ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार करणे बंधनकारक आहे.

वरील संदर्भीय संपादन मार्गदर्शक सूचनेनुसार समुदाय आधारित संस्थेच्या स्तरावर करण्यात येणाऱ्या विविध घटकांच्या संपादन प्रक्रियेत निविदा शुल्क हि समुदाय आधारित संस्थेने त्यांच्या स्तरावर निश्चित करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे.

सद्य स्थितीत समुदाय आधारित संस्था त्याच्या स्तरावर निविदा शुल्क हे रु. ५००० ते १५०००ऐवढी रक्कम ठेवण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे व त्यासाठी कोणताही निष्कर्ष नसतो . सदरची निविदा शुल्क रक्कम ही वाजवी नसल्याने निविदा प्रक्रियेत जास्तीत जास्त प्रतिसाद मिळत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे संपादन प्रक्रियेत निविदा शुल्क सर्व समुदाय आधारित संस्थान मध्ये एकसारखे पणा येण्यासाठी तसेच निविदा प्रक्रियेत जास्तीत जास्त ठेकेदार/ पुरवठादार यांनी सहभाग घेण्यासाठी वस्तू व बांधकाम बाबतच्या निविदा प्रक्रियेमध्ये खालील प्रमाणे जास्तीत जास्त निविदा शुल्क आकारण्यात यावे.

| अ.क्र. | निविदेची अंदाजित रक्कम | निविदा शुल्क |
|---|---|---|
| १ | रु. ३ लाख ते रु. ५० लाखापर्यंत | रु. ५०० + GST |
| २ | रु. ५० लाखापेक्षा जास्त ते रु. २ कोटी | रु. १००० + GST |
| ३ | रु. २ कोटी पेक्षा जास्त ते रु. ५ कोटी | रु. २००० + GST |
| ४ | रु. ५ कोटी पेक्षा जास्त ते रु. १०० कोटी | रु. ३००० + GST |

टीप: ज्या समुदाय आधारित संस्थाना GST लागू आहे अशा संस्थानीच GST ची रक्कम आकारण्यात यावी.

(कौस्तुभ दिवेगावकर भा.प्र.से.)
प्रकल्प संचालक ,स्मार्ट